# जागतिकीकरणामुळे 'कॉस्ट अकाऊंटंट' अत्यावश्यक

**'आयसीडब्ल्यूए' परीक्षेतील यशस्वीतांच्या कौतुक सोहळ्यात एसबीआयचे जयकरण यांचे प्रतिपादन**

**औरंगाबाद, दि.९ (लोकमत ब्युरो)**- जागतिकीकरणामुळे प्रत्येक बँका व इतर कंपन्यांमध्ये 'कॉस्ट अकाऊंटंट' असणे ही काळाची गरज बनली असून, त्यामुळेच या क्षेत्रातील प्रशिक्षितांना मानाचे स्थान मिळू लागले आहे, असे मत भारतीय स्टेट बँकेचे उपसरव्यवस्थापक जयकरण यांनी व्यक्त केले आहे.

'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँण्ड वर्क्स अकाऊंटंटस् ऑफ इंडिया'च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ९४ विद्यार्थ्यांचे औरंगाबाद चॅप्टरच्या वतीने कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमात जयकरण बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागप्रमुख डॉ.डब्ल्यू.के. सरोदे, अहमदाबाद चॅप्टरचे अध्यक्ष पी. डी. मोड, भारतीय स्टेट बँकेचे मुख्य व्यवस्थापक यशवंत काहू प्रमुख पाहुणे होते.

'आयसीडब्ल्यूए'ची परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झालेल्यांना पारितोषिके देण्याची घोषणा ए. आर. जोशी, रामानंद मोदाणी, संजय मुंदडा, भारत आसवा, आशीष देवढे, प्रणव पटेल व मनोज मालपाणी यांनी केली. औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी यशस्वीतांचे कौतुक केले. स्वप्नील साहुजी, शिल्पा विध्वंस, समीर यंबळ, वैशाली देशपांडे यांचा त्यात समावेश होता. यावेळी डी. व्ही. डाबरी, एम. आर. पंडित, एस.बी. खडके, आर. डी. खंडाळकर, नितीन शर्मा, युगांती भट्टाचार्य, आर. बी. मुळी आदी उपस्थित होते.




'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँण्ड वर्क्स अकाऊंटंटस् ऑफ इंडिया'च्या परीक्षेतील यशस्वीतांच्या कौतुक सोहळ्यात जयकरण, डब्ल्यू.के. सरोदे, पी. आर. गोरे, ए. आर. जोशी आदी.

दैनिक लोकमत
दि. 10-9-07

# 'व्हॅट'वरील कार्यशाळा उत्साहात

**औरंगाबाद, ता. ८ :** औरंगाबाद सेंटर ऑफ कॉस्ट अकौंटंट्स या आयसीडब्ल्यूए, कोलकताच्या स्थानिक शाखेतर्फे शनिवारी (ता. आठ) हॉटेल विंडसर कॅसल येथे 'मूल्यवर्धित विक्रीकर कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी आणि त्याचे अंकेक्षण (ऑडिट)' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी सहायक विक्रीकर आयुक्त एन. नवीन सोना होते.

या कार्यशाळेत पुण्याचे प्रख्यात विक्रीकर सल्लागार आणि आयसीडब्ल्यूए, कोलकता या केंद्रीय समितीचे सदस्य ब्रिजमोहन शर्मा, विवेक बिमनवार, माजी विक्रीकर उपायुक्त अजय देवरस आणि सुधीर संत यांनी मार्गदर्शन केले आणि शंका निरसन केले.

श्री. सोना यांनी, कॉस्ट अकौंटंटना व्हॅट ऑडिट करण्याची परवानगी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. विक्रीकर विभागाचे संपूर्ण आधुनिकीकरण होत असून, संगणकीकरण, एक खिडकी योजना, तक्रार निवारण कक्ष आदींची माहिती त्यांनी दिली. सूत्रसंचालन संजय मुंदाडे यांनी केले. स्वागत शाखा अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी केले. उपाध्यक्ष आर. पी. भंगाळे यांनी परिचय करून दिला. आर. एम. पंडित यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली, तर सचिव बिश्वेश्वर सेन यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी ए. आर. जोशी, आर. जी. मोदानी, आर. डी. खंडाळकर, एस. बी. खडके, जी. बी. गलांडे, एस. जे. देवरे आदींनी प्रयत्न केले.



**'आयसीडब्ल्यूए'तर्फे आयोजित 'व्हॅट'वरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सहायक विक्रीकर आयुक्त एन. नवीन सोना, प्रमुख वक्ते बी. एन शर्मा, विवेक बिमनवार, अजय देवरस, सुधीर संत, चॅप्टर अध्यक्ष आर. पी. गोरे आणि संजय मुंदाडे.**

दैनिक सकाळ
दि. ९-९-०७

# Globalisation has increased demand for CAs: Jai Karan

**LOKMAT NEWS SERVICE**

**Aurangabad, Sept. 8:** State Bank of India (SBI) deputy general manager Jai Karan said globalisation has increased the demand for cost accountants.

He was speaking at a felicitation function of successful students of the Institute of Cost and Works Accountants of India (ICWA) examination here recently. The head of the department of commerce and management science at Bamu Dr W K Sarode, president (Ahmedabad chapter of ICWA) P D Mod and SBI chief manager Yashwant Kahu were the guests of honour.

In his speech, Dr Sarode said the ICWA course is a versatile one and must not be taken lightly. A R Joshi, Ramanand Modani, Sanjay Mundade, Bharat Asawa, Ashish Deodhe, Pranav Patel and Manoj Malpani presented prizes to the students who have cleared the examination with distinction.

Chairman (ICWA, Aurangabad chapter) R P Gore and chairman of training committee A R Joshi also congratulated the students.

Swapnil Sahuji, Shilpa Vidwanus, Sameer Yambal and Vaishali Deshpande have passed the ICWA finals. D V Dabri introduced the guests and SP Bangale made the introductory speech. Shilpa Vidwanus conducted the proceedings and Bisweshwar Sen proposed a vote of thanks.




ICWA successful students pose with SBI deputy general manager Jai Karan after their felicitation held in Aurangabad recently. Also seen are W K Sarode, P R Gore, A R Joshi and others.

Prominent among those present were M R Pandit, S B Khadke, R D Khandalkar, Nitin Sharma, Yuganti Bhattacharya, Dharmendra Kumar, Shishir Bhalchandra, R B Muli, Milind Muli, Ajay Gokhale, Rahul Joshi, Rahul Loha[illegible] and Shilpa Yeole.